Shailesh Tilak
General Secretary

Datta Aphale
Secretary- T.C.

MAHARASHTRA JUDO
ASSOCIATION
महाराष्ट्र ज्यूदो संघटना
Affiliated to Judo Fedration of India &
Maharashtra Olympic Association
Trust Registration Number F-3967 Mumbai

568, Narayan Peth, Tilak Wada, Pune-411030;
gs.mahajudo@gmail.com; +91-94220 29656 | tc.sec.mahajudo@gmail.com; +91-94231 50231

**प्रति,** 27 सप्टेंबर 2025, पुणे

मा. सचिव,
सर्व संलग्न आणि आमंत्रित जिल्हा ज्यूदो संघटना

विषय: 52 वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी -2025-26-जळगांव

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन तर्फे ज्युनियर गटाच्या राज्य स्पर्धा तसेच राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा जळगांव येथे 'जळगांव जिल्हा हौशी ज्यूदो संघटना' यांच्या सहकार्याने आयोजित केल्या गेल्या आहेत. सदरील ज्युनियर्स राष्ट्रीय ज्यूदो स्पर्धा ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे दि. 27-30 नोव्हेंबर 2025 दरम्यान कोलकाता येथे आयोजिणार असल्याचे कळते.

आपल्या असोसिएशनला दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुण्याच्या पुनीत बालन गृप या प्रतिष्ठित संस्थेने ज्यूदो खेळ आणि ज्यूदोपटू यांच्या अधिक प्रगतीसाठी अर्थसाहाय्य केलेले आहे त्याबद्दल महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन श्री पुनीत बालन यांचे मनापासून आभार प्रकट करते. श्री पुनीत बालन यांच्या दातृत्वामुळे सर्व अभ्यागत आणि खेळाडूंसाठी करण्यात येणारी भोजन आणि निवास व्यवस्था ही नि: शुल्क असेल.

52 वी राज्य ज्युनियर ज्यूदो स्पर्धेचा तपशील खालीलप्रमाणे ;

1) कालावधी: दिनांक 31 ऑक्टोबर, 01 आणि 02 नोव्हेंबर 2025 (शुक्रवार, शनिवार आणि रविवार)
2) ठिकाण: स्पर्धा आणि निवास : श्री छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड मार्ग, जळगांव
3) वेळापत्रक: सामन्यांचे अंदाजे वेळापत्रक खालील प्रमाणे (यात परिस्थितीनुरूप बदल होवू शकतो.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खेळाडुंचे 31/10/2025 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन.<br>त्यानंतर वयाचे दाखले तपासणे, संध्याकाळी 06.00 वाजता व्यवस्थापक, प्रशिक्षक पंच, मिटींग, लॉटस टाकणे. | | | | |
| दिनांक | गट | वजन श्रेणी | ट्रायल वेट | फायनल वेट |
| 31/10/2025 | मुले | सर्व वजन गट | संध्याकाळी 04.00 ते 05.00 | संध्याकाळी 05.00 ते 06.00 |
| 01/11/2025 | मुलांच्या स्पर्धा | | सकाळी 08.30 ते वजन गट संपेपर्यंत | |
| 01/11/2025 | मुली | सर्व वजन गट | संध्याकाळी 04.00 ते 05.00 | संध्याकाळी 05 ते 06.00 |
| 02/11/2025 | मुलींच्या स्पर्धा | | सकाळी 08.30 ते वजन गट संपेपर्यंत | |
| स्पर्धा समाप्तीनंतर सर्वांचे आपापल्या गांवी परतणे आवश्यक आहे कारण 02/11/2025 रोजी रात्रीच्या निवासाची सोय नाही. | | | | |

31/10/2025 रोजी संध्या. 06.00 वा. आयोजित सभेस सर्व व्यवस्थापक, प्रशिक्षक, पंच यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

4)प्रवेशिका (एंट्री फॉर्म): सोबत जोडलेली असून ती व्यवस्थित टाईप करून दिनांक **25/10/2025** पर्यन्त महाराष्ट्र ज्यूदो संघटनेच्या वेबसाईटवर (www.mahajudo.com) अपलोड करावा. सर्व एंट्री (प्रवेशिका) ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारल्या जातील. यासाठी आपण आपल्या खेळाडूंची यादी त्यांच्या तपशिलांसह आणि प्रत्येकाचा पासपोर्ट आकाराचा फोटो आधी तयार ठेवावा. (ऑनलाइन प्रवेशिका भरताना आपणास काही अडचण आली तर लगेचच श्री आदर्श शेट्टी – 98338-57072 यांच्याशी संपर्क साधावा.)
5)उशीराची एंट्री-(लेट एंट्री) दि. 25/10/2025 रोजी रात्रो 11.59 नंतर पाठवलेल्या एंट्री या लेट एंट्री असून आपण त्यामध्ये दि. 27/10/2025 रोजीच्या रात्रो 11.59 पर्यन्त बदल करू शकता, या उशीराची एंट्रीसाठी प्रति संघ शुल्क रुपये 1,500/-.

यदाकदाचित जर प्रवेशिकेमधील नावांमधील काही चुका झाल्यास सुधारित ओळखपत्रे किंवा प्रमाणपत्रे तयार करण्यासाठी दंड म्हणून प्रति नांव रुपये 500/- (रू. पाचशे मात्र) आकारले जातील यासाठी प्रवेशिका भरतेवेळी योग्य ती खबरदारी घ्यावी.

एंट्री फॉर्मवर अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी जन्मतारखेच्या दाखल्यांसह द्यावा.

- एंट्रीबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती जमा कराव्यात तसेच एक पासपोर्ट आकाराचा फोटो जमा करावा.
- मूळ कागदपत्रे पाहिल्यावर झेरॉक्स दाखले प्रमाणित करून MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील आणि मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे लगेचच दिली जातील.
- त्यामुळे संघ व्यवस्थापकांनी झेरॉक्स दाखले सत्यापित झाल्यावर मूळ दाखले आठवणीने न्यावेत. ही जबाबदारी संघ व्यवस्थापकांची असेल. संघ व्यवस्थापकांनी मूळ दाखले परत न नेल्यास / गहाळ झाल्यास राज्य ज्यूदो संघटनेचे कोणतेही पदाधिकारी, आयोजक, संघटनेचे पदाधिकारी अथवा स्पर्धेसाठी नेमलेले कोणतेही तांत्रिक अधिकारी जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी म्हणून संघ व्यवस्थापकांना काम झाल्यावर दाखले परत घेण्याच्या सूचना जिल्हा सचिवांनी गांभियनि द्याव्यात.

➢ प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.

- ✓ प्रवेश शुल्क: रुपये 500/- प्रती खेळाडू. दिनांक 25/10/2025 नंतरचे प्रवेशिकेचे शुल्क उशीराचे असल्याने दंडस्वरूपी सांघिक शुल्क रू. 1,500/- महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनच्या बचत खात्यामध्ये भरावे.
- ✓ प्रवेश अथवा उशीराचे शुल्क एकूण संघातील खेळाडूंच्या संख्येनुसार रुपये 500/- प्रत्येक खेळाडू याप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्रच्या आपल्या गावातील शाखेत खाते क्रमांक 20 12 45 16 561 या महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनच्या बचत खात्यामध्ये भरावे. बँकेच्या पैसे भरणा पावतीची फोटोकॉपी श्री रवी मेटकर यांना (94227-62631) या क्रमांकावर लगेच व्हाट्सअप करावी आणि मूळ पावती एंट्री फॉर्म बरोबर स्पर्धास्थळी द्यावी.
- ✓ संलग्नता शुल्क आणि ओळखपत्राचे शुल्क हे स्पर्धास्थळी द्यावेत.
- फक्त प्रवेश शुल्क बँकेच्या खात्यात भरावे. निमंत्रित संघांसाठी प्रवेश शुल्काव्यतिरिक्त वर्षातील तीनही स्पर्धांचे एकत्रित आमंत्रित शुल्क जमा करण्याबाबतच्या सातारा येथील 23.07.2017 रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण बैठकीमधील एकमताच्या ठरावाप्रमाणे, ज्या संघटनांनी शुल्क भरले नसतील त्या सर्व निमंत्रित संघांना सबज्युनियर, कॅडेट, ज्युनियर तसेच सिनियर्स स्पर्धांचे वार्षिक एकत्रित शुल्क रुपये 3000/- स्पर्धास्थळी भरावे लागतील.

- भोजन: भोजनाची व्यवस्था महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनद्वारे करण्यात येईल.
  यामध्ये दि. 31 ऑक्टोबर, 01 आणि 02 नोव्हेंबर 2025 रोजीसाठी एकूण 02 न्याहारी, 05 भोजन सामील आहे.
- निवास व्यवस्था: दिनांक 31/10/2025 रोजी सकाळी 08.00 पासून ते 02/11/2025 रोजी रात्रीपर्यंतच केलेली आहे.
- जिल्हा संघासह एक व्यवस्थापक आणि एक प्रशिक्षक (एकूण फक्त दोन) अनिवार्य असून हे पदाधिकारी संघासोबत नसल्यास संघास निवास-भोजनाची व्यवस्था करून दिली जाणार नाही.
- अनामत रक्कम: प्रत्येक संघास रु 5,000/- अनामत रक्कम जमा करावे लागतील.
- **पंचांनी दि. 31.10.2025 रोजी सकाळी 08 वाजेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.**
- स्पर्धा नियम: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे आयोजिल्या जातील.

6) नोंदणी ओळखपत्र शुल्क: रु. 100/- प्रत्येकी (खेळाडूची नोंदणी तीन वर्षातून फक्त एकदाच करायची आहे.)

7) वय-गट: जन्मतारखेची मर्यादा –

| गट | वयाची अट | वजनगट मुले | वजनगट मुली |
|---|---|---|---|
| ज्युनियर्स | 15 वर्षावरील आणि 21 वर्षांखालील म्हणजेच **2005, 2006, 2007, 2008, 2009** आणि **2010** या वर्षात जानेवारी ते डिसेंबर दरम्यान जन्मलेले खेळाडू पात्र आहेत.<br>(18 वर्षाखालील खेळाडूंच्या पालकांकडून जिल्हा संघटनांनी हमीपत्र घ्यावे. याचा नमूना या परिपत्रकासोबत दिला आहे. याशिवाय 15 वर्षाखालील खेळाडूंना जिल्हा चांचणी स्पर्धेत खेळू देवू नये आणि या राज्य स्पर्धेसाठी पाठवू देखील नये.) | 60 किलोखाली,<br>66 किलोखाली,<br>73 किलोखाली,<br>81 किलोखाली,<br>90 किलोखाली,<br>100 किलोखाली<br>आणि 100 किलोवर | 48 किलोखाली,<br>52 किलोखाली,<br>57 किलोखाली,<br>63 किलोखाली,<br>70 किलोखाली,<br>78 किलोखाली<br>आणि 78 किलोवर |

जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे त्यांच्या झेरॉक्ससह वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.

- अ) महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,
- ब) मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र ( यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्यांच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.
- क) भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही. (दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)

वय सत्यापन चांचणी (Age Verification Test -AVT)

वय सत्यापन चांचणी म्हणजे डिजिटल एक्सरे टी. डब्ल्यू. टेस्ट. यासाठी खालील माहिती नीट वाचावी;

फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चांचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चांचणी शिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपण जरी राज्यस्पर्धेसाठी ही चांचणी अनिवार्य करणार नसलो तरी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी मात्र ही चांचणी करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी डेरवण येथील स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चांचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. शासकीय दवाखान्यातील पुरावा हा सबळ ठरू शकतो म्हणून शक्यतो ही चांचणी शासकीय दवाखान्यात करावी. जर तशी सोय आपल्याकडे उपलब्ध नसेल तरच ती इतर ठिकाणी करावी.

फेमीनिटी कंट्रोल- ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडियाने परिपत्रकात सूचित केल्याप्रमाणे प्रत्येक महिला खेळाडूस त्रीरोग तज्ञांतर्फे इंग्रजी अथवा हिन्दी भाषेत जारी केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र आणावे लागेल ज्यात सेक्स आणि नॉन प्रेग्नंसी रिपोर्ट असेल.
सदरील प्रमाणपत्र राज्य स्पर्धेसाठी आवश्यक नाही परंतु जे खेळाडू या स्पर्धेतून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडले जातील अशा महिला खेळाडूंनी मात्र सदरील प्रमाणपत्र स्वत: बरोबर ठेवावे लागेल.

13) राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवडल्या गेलेल्या खेळाडूंना स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सूचना दिल्या जातात, तेंव्हा संबंधित खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी घेऊन या मिटिंगसाठी संबंधित खेळाडू उपस्थित रहाण्याची ताकीद द्यावी. फेडरेशननी कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय स्पर्धेच्या सहभागासाठी निर्धारित ज्यूदोगी घालूनच खेळावे लागेल. यासाठी अशा ज्युदोगीची उपलब्धता करणे ही जबाबदारी राज्य संघामध्ये निवडल्या गेलेल्या प्रत्येक खेळाडूची वैयक्तिक जबाबदारी असेल.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार डोपिंगबाबत कडक धोरण राबवले जात असल्याने डोपिंग टेस्ट गांभिर्याने केल्या जात आहेत. काही दिवसांपूर्वी खेळाडूंच्या अशा चांचणी करून दोषी खेळाडूंना खेळण्यास बंदी आणल्याचेही सर्व राज्य संघटनांना फेडरेशनने कळवले आहे. त्यामुळे आपण आपल्या जिल्ह्याच्या संघामधील प्रत्येक खेळाडूकडे जातीने लक्ष देवून खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाहीत याची खातरजमा करावी. डोपिंग टेस्टची सुरुवात राज्य स्पर्धेपासून करण्याचाही शासनाचा मानस आहे याची जाणीव खेळाडूंना करून द्यावी जेणेकरून मेडलच्या छोट्या मोहापायी खेळाडूने आपले संपूर्ण करियर आणि आयुष्य वाया घालवण्यापासून आपण सर्वांनी परावृत्त करावे.

राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

महाराष्ट्र ज्यूदो संघटना कोणत्याही परिस्थितीत कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा जिल्ह्याचे निलंबनदेखील होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव / अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

- वैद्यकीय / अपरिहार्य कारणाशिवाय मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 100/- दंड केला जाईल. कारणाची सत्यता राज्य संघटना तांत्रिक समिती सचिव पडताळून पाहातील.

8) संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्यूदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.

9) सभासद नसणाऱ्या जिल्हा ज्यूदो संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या-न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्यूदो संघटनेकडे सुरक्षित असेल.

10) प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.

11) सर्व पत्रव्यवहार ज्यूदो संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.

- ✓ आयजेएफच्या/जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते.
- ✓ रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- ✓ आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.
- ✓ राष्ट्रीय स्पर्धांचे परिपत्रक अजून आपल्याला प्राप्त झाले नाही. जर स्पर्धा नियमात काही बदल ज्यूदो फेडरेशनद्वारे ऐनवेळेस कळवले गेल्यास तसे बदल विनासूचना अंगिकारण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्यूदो संघटना राखून ठेवत आहे.

महाराष्ट्र ज्यूदो संघटनेच्या सर्व उपक्रम/कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर www.mahajudo.com हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी. कळावे, शुभेच्छांसह,

आपला विश्वासू,

दत्ता आफळे
महासचिव
महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन

माहिती साठी संपर्क;

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री दत्ता आफळे<br>श्री शैलेश टिळक | महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन | 94231 50231<br>94220-29656 | gs.mahajudo@gmail.com | ज्यूदो संदर्भातील अडचणीसाठी |
| श्री आदर्श शेट्टी | महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन | 98338-57072 | adarsh.shetty07@outlook.com | वेबसाईट, एंट्रीफॉर्म भरणे-अपलोड यासाठी |
| श्री विकास देसाई | | 94216-76837 | vikas.acem@gmail.com | |
| डॉ उमेश पाटील | जळगांव जिल्हा हौशी ज्यूदो असोसिएशन | 97306 23497 | स्पर्धेसंदर्भातील प्रश्न (भोजन-निवास आदीसाठी) संपर्क | |
| श्री अजय कशिद | | 98907 93730 | | |

Steps to upload Entry Forms

1. Visit www.mahajudo.com
2. Under Events menu, click on Entry form sub-menu.
3. You will find tournament names on that page. Click on the tournament for which the entry form is needed. Entry form will be downloaded. Fill the entry form (in excel sheet format).
4. On website, under Events menu, click on "Upload entry form" submenu;
6. A login page will open. There enter the credentials shared with you. On login, you will see the tournament name, below that there will be a place to upload the file. Click on that button, and select the entry file which you have filled.
7. If the file gets uploaded successfully, you will be redirected to a page, where you can find the name of the players which you entered in the entry. Kindly check the name and entries. In case of difficulty kindly contact Adarsh Shetty 9833857072

प्रति,
सचिव
____________ जिल्हा ज्यूदो संघटना

विषय: ज्यूदो स्पर्धेच्या सहभागासाठी खेळाडूच्या पालकांचे परवानगी पत्र

महोदय / महोदया,

मी या पत्राद्वारे माझा पाल्य (पूर्ण नाव) कुमार / कुमारी इयत्ता यास महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनद्वारे दिनांक 31 ऑक्टोबर, 01 आणि 02 नोव्हेंबर 2025 रोजी 52 वी ज्युनियर (मुले-मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा-2025, जळगांव येथे आयोजित राज्य स्पर्धेच्या पूर्व तयारीचा भाग असलेल्या जिल्हा निवड चांचणी स्पर्धेमध्ये तसेच राज्य स्पर्धेमध्ये ज्यूदो खेळाडू म्हणून सहभागी होण्यासाठी मी माझी परवानगी देत आहे. मला ज्यूदो खेळातील तसेच खेळण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासादरम्यानच्या जोखीमींची पूर्वकल्पना जिल्हा संघटेनेद्वारे दिलेली आहे.

मला हेही माहिती आहे की, माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य संघटनेचे पदाधिकारी माझ्या पाल्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक आणि योग्य ती सर्व काळजी घेत आहेत.

योग्य ती सर्व काळजी घेऊनही, जर कदाचित कोणतीही अप्रिय घटना घडल्यास मी माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य ज्यूदो संघटनेचे पदाधिकारी यांना जबाबदार धरणार नाही.

मी या पत्राद्वारे अशीही हमी देतो की, माझा पाल्य सुरक्षिततेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळेल आणि त्यांनी ते आयुष्यात नेहमीच पाळावेत यासाठी मी त्याला मार्गदर्शनही केलेले आहे.

कृपया माझ्या पाल्याबाबत खालील वैद्यकीय नोंद ठेवावी; (लागू नसल्यास लागू नाही असे लिहावे)

| | |
|---|---|
| ॲलर्जी: | ____________________ |
| नेहमीची औषधे घेत असल्यास: | ____________________ |
| काही आजार / जखम | ____________________ |
| टिटॅनियसचे इंजेक्शन कधी घेतले आहे. | ____________________ |
| रक्त गट | ____________________ |

पालकांचे नाव आणि स्वाक्षरी: ____________________________;

____________________________________

तारीख: /10/2025; ठिकाण: ____________

# 52 वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर्स ज्यूदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चांचणी -2025 जळगांव

जिल्हा ज्यूदो असोसिएशनचे नाव: ____________________________________________

दहावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

बारावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सचिवांची स्वाक्षरी _________________________

सचिवांचे नाव ______________________

सचिवांचा रबरी शिक्का: